अतिरिक्त महापालिका आयुक्त(वि)
पुणे महानगरपालिका
ठराव क्रमांक :- १/२३७
दिनांक :- १४/०७/२०१७.

अतिरिक्त महापालिका आयुक्त(वि) कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जा. क्र :- अतिमआ(वि)/साप्रवि/आस्था/२२४८
दिनांक :- १४/०७/२०१७.

# आज्ञापत्र

**विषय:-** सफाई सेवक, सेवानिवृत्त, मयत अथवा शारिरिकदृष्टया अपात्र ठरल्याने म.न.पा. सेवेतून मुक्त करण्यात आलेल्या सेवकाच्या एका पात्र वारसास मा. लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारस हक्काने मे. राज्य शासनाच्या दि. ३०.०६.१९९४ चे निर्णयानुसार नियुक्ती बाबत...

**संदर्भ:-** १) मा. अति. महापालिका आयुक्त (ज) ठ.क्र. १/१८८, दि.१७.०६.२०१७.
२) शासन परिपत्रक क्र. बीसीसी–२००२/१९५२/प्र.क्र. ६५/२००२ /१६–ब, मंत्रालय, मुंबई –३२, दिनांक ०१.१०.२००३.

पुणे महानगरपालिकेच्या कायम आस्थापनेवरील सफाई सेवक मनपा सेवेत असतांना सेवानिवृत्त/ऐच्छिक सेवानिवृत्त/शारिरीकदृष्टया अपात्र/ मयत झाल्यास मा. लाड कमिटीच्या शिफारशीनुसार एका पात्र वारसास शासन निर्णयातील तरतूदीनुसार वारस हक्काने नियुक्ती दिली जाते. संदर्भ क्र. २ चे परिपत्रकातील क्र. २–ब ''लाड कमिटीच्या शिफारशीनुसार नियुक्ती करताना उमेदवाराचे त्यांचे जातीचा विचार करून नव्हे तर त्यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्या आधारे त्यांची नेमणूक करावी अशी तरतूद आहे.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील आरोग्य/घनकचरा व्यवस्थापन, औंध क्षेत्रिय कार्यालयाकडील सेविक कै. रणजित सिताराम चावरिया, हुद्दा– मेहतर हे दि. ०२/०९/२०१६ रोजी मयत झाले आहेत. त्यांना घाण भत्ता लागू असल्याने वारस करार व मा. लाड समितीच्या शिफारशीनुसार त्यांचा कायदेशीर वारस मुलगी श्रीमती मधु रणजित चावरिया यांना लिपीक टंकलेखक वर्ग ३ या त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या वे.श्रे (रु.५२०० ते २०२०० + ग्रेड पे २९०० + मान्य भत्ते) या हुद्याच्या शेड्युलमान्य रिक्त जागेवर नेमणूक करणेस संदर्भ क्रमांक १ चे ठरावान्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

वारस नेमणुकीबाबत खाली दर्शविल्याप्रमाणे लिपीक टंकलेखक वर्ग ३ या त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या वे.श्रे (रु.५२०० ते २०२०० + ग्रेड पे २९०० + मान्य भत्ते) च्या रिक्त जागेवर खालील उमेदवाराची आज्ञापत्राचे दिनांकापासून अगर प्रत्यक्ष हजर होतील त्या दिनांकापासून खालील तपशीलाप्रमाणे शेड्युलमान्य रिक्त जागेवर हंगामी नेमणूक करण्यात येत आहे.

१४.७

..२..

| अ.क्र | सेवकाचे नांव व पत्ता | नेमणूक खाते व हुद्दा | तपशील |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती मधु रणजित चावरिया<br>गट– अजा<br><br>पत्ता : – स.नं.१५४, बोपखेल, रामनगर, गुप्ता बिल्डिंग पुणे–४११ ०३१. | विद्युत विभाग<br><br>हुद्दा:– लिपीक टंकलेखक | पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील आरोग्य/घनकचरा व्यवस्थापन, औंध क्षेत्रिय कार्यालयाकडील सेविक कै. रणजित सिताराम चावरिया, हुद्दा– मेहतर हे दि. ०२/०९/२०१६ रोजी मयत झाले आहेत. त्यांना घाण भत्ता लागू असल्याने वारस करार व मा. लाड समितीच्या शिफारशीनुसार त्यांचा कायदेशीर वारस मुलगी श्रीमती मधु रणजित चावरिया यांची घाणभत्ता वारस करारानुसार व दि.०१.१०.२००३ चे शासन परिपत्रकानुसार श्री.गोडे दत्तु संतु यांचे सेवानिवृत्तीने रिक्त जागी हंगामी नेमणुक मान्य. |



प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग
पुणे महानगरपालिका

१. वरील उमेदवारांस मनपा सेवाविनिमयानुसार वेतन व भत्ते आदा करण्यात यावे.

२. वरील नेमणूक पूर्णपणे हंगामी स्वरूपाची असून सेवाविनियम १०(अ) नुसार परिविक्षाधीन पद्धतीने करण्यात येत आहे. परिविक्षाधीनतेचा २ वर्षाचा कालावधी संपण्यापूर्वी २ महिने अगोदर सदर उमेदवारांची नेमणूक पुढे चालू ठेवणेविषयीचा अभिप्राय संबंधित मा. खातेप्रमुख यांनी आमच्याकडे पाठविणे आवश्यक आहे. वरील उमेदवाराचे काम समाधानकारक न झाल्यास अगर कामावरील हजेरी अनियमित असल्यास तसेच दाखल केलेली माहिती व कागदपत्रे यामध्ये तफावत आढळून आल्यास वरील उमेदवारास कोणतीही पूर्वसूचना(नोटीस) न देता केव्हाही कोणत्याही वेळी मनपा सेवेतून कमी करण्यात येईल.

३. वरील उमेदवाराने हजर होतेवेळी नियमानुसार सेवा अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.

४. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. अंनियो १००५/१२६/सेवा–४ मंत्रालय मुंबई ३२ दि.३१.१०.०५ नुसार सेवेत दि.१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन ऐवजी पारिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात येईल.

५. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञपन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना अ या आज्ञापत्रासोबत जोडला आहे. तो उमेदवाराने नेमणुकीचे खात्याकडे रुजू होतांना भरून देणे बंधनकारक आहे. त्याशिवाय उमेदवारांस संबंधित खात्याने हजर करून घेऊ नये. (महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. एसआरव्हि २००० / प्र.क्र.१७ /२००० /१२ दि.१.७.२००५)

६. मनपा सेवाविनियम व सेवावर्तणूक नियमांचे पालन करणेबाबतच्या सूचना संबंधी मा.खातेप्रमुख यांनी सदर उमेदवार यांना देणेची तजविज करावी.

७. **श्रीमती मधु रणजित चावरिया यांना भविष्यात यापुढे घाण भत्ता व मा. लाड कमिटीच्या शिफारशींचे फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.**

..३..

८. संबंधित उमेदवाराने मे.राज्य शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अकंपा-१०१०, प्र.क्र. ३०८/१०/आठ, दिनांक ०६/१२/२०१० नुसार '' घाणभत्ता वारस करारानुसार लिपीक पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवाराने मराठी टंकलेखनाची ३० श.प्र.मी. वेग मर्यादेचे शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यास ६ महिने मुदत पुढील अटीच्या अधिनस्त देण्यात येत आहे.''

अ) विहीत कालावधीत हे प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित उमेदवाराची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

या अटीची तंतोतत अंमलबजावणी करावयाची संपुर्ण जबाबदारी संबंधित मा.खातेप्रमुख यांचेवर राहिल.

९. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि. १९/३/२००३ अन्वये संबंधित उमेदवाराने हजर झालेच्या दिनांकापासुन २ वर्षाच्या आत शासनाची संगणक विषयक एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. सदर परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण न झाल्यास त्याची नेमणूक संपुष्टात आणण्यात येईल.

१०. मे. शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दिनांक १२ डिसेंबर २०११, अन्वये वरील आज्ञापत्रामधील ज्या सेवकांची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागेवर झाली आहे अशा सेवकांची त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्यात आली आहे. ज्या सेवकांची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागेवर झाली आहे अशा सेवकांनी नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ (सहा) महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता सादर करणे बंधनकारक आहे.

मागासवर्गीय सेवकांनी नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात वैधता समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेली पोचपावतीची साक्षांकित प्रत सेवकवर्ग विभाग कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर संबंधीत सेवकाचे नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येतील.

११. संबंधित उमेदवार हे महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्ती केल्यानंतर पुणे महापालिकेच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदली योग्य राहतील.

१२. संबंधित उमेदवारांनी त्यांची नेमणूक झालेल्या खात्यात हजर व्हायचे आहे व त्या खात्यात संबंधित उमेदवाराने सेवाप्रवेश करतांना शैक्षणिक पात्रतेबाबतचे दाखले जन्मतारखेबाबत उतारा/दाखला हजर करणे आवश्यक आहे. ज्या उमेदवाराकडे अशा प्रकारे दाखला नसेल त्यांच्याबाबतीत शाळा सोडल्याचा दाखला, शालांत परीक्षेचे प्रमाणपत्र यामध्ये नमूद केलेली जन्मतारीख ग्राह्य धरण्यात येईल. परंतु अशा उमेदवारांची भविष्यात जन्मतारीख बदलण्याची विनंती मान्य करता येणार नाही. याबाबतची स्पष्ट कल्पना संबंधित उमेदवार यांस देण्यात यावी. तदनंतर काही कायदेशीर बाब निर्माण झाल्यास त्यास संबंधित खाते जबाबदार राहील.

. ४ . .

१३. तरी वरील उमेदवारानी नेमणुकीचे विभागात हजर होण्यापूर्वी जन्म दिनांकाबाबत जरूर ती पुराव्याची कागदपत्रे संबंधित विभागप्रमुखांना दाखवावीत व त्यांच्याकडून मा.आरोग्यप्रमुख, पुणे मनपा यांचे नांवे शारिरिक तपासणी करून घेण्यासाठी पत्र घ्यावे व मा. आरोग्यप्रमुख यांचेकडून पूर्वनियोजित वेळेनुसार शारिरिक तपासणी करून घ्यावी व शारिरिक पात्रतेचा दाखला प्राप्त करून घ्यावा, असा दाखला असल्याशिवाय संबंधित उमेदवाराला खातेप्रमुखांनी कामावर हजर करूऊ घेऊ नये.

१४. वरील उमेदवार सदर आज्ञापत्राचे दिनांकापासून आठ दिवसाचे आत नेमणुकीचे विभागात हजर न झाल्यास त्यांची नेमणूक रद्द समजण्यात येईल. वरील सेवकास मनपा सेवेचा राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी मनपास १ महिन्याची पूर्वसूचना (नोटीस) देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे पूर्तता न केल्यास १ महिन्याच्या पूर्वसूचनेकरिता आवश्यक असलेल्या मुदतीचा सर्व भत्त्यांसह पगार त्यांच्याकडून वसूल करण्यात येईल.

१५. पुणे महानगरपालिका सेवाभरती नियम, २०१४ नुसार नियुक्त कर्मचाऱ्यांनी त्यांची नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षात ३ संधीमध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

१६. वरील उमेदवार यांनी नेमणुकीचे संदर्भात जात,शैक्षणिक पात्रता,जन्म दिनांक, अनुभव इ. बाबत सादर केलेली माहिती केव्हाही असत्य आढळुन आल्यास त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतुन कमी करण्यात येईल.

१७. मा. प्रशासन अधिकारी यांनी सदर आज्ञापत्रात नमूद केलेल्या बाबींची वरील उमेदवारास समज देवून त्याची समज मिळाल्याबाबत आज्ञापत्राचे एका प्रतीवर स्वाक्षरी घ्यावी व त्याप्रमाणे सेवकवर्ग विभाग कार्यालयाकडे निवेदन पाठवावे.

१८. वरील सर्व नियमांची काटेकोरपणे कार्यवाही करणेविषयी मा.खातेप्रमुख यांनी दक्षता घ्यावी.

तरी संबंधित मा.खातेप्रमुख यांनी वरीलबाबत पुढील जरूर ती तजविज करावी.

(प्रेरणा देशभ्रतार)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि)
पुणे महानगरपालिका

**प्रत:- संबंधित मा. खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी,** पुणे महानगरपालिका
यांजकडे माहितीसाठी व तजविजीसाठी रवाना.

(संतोष भोर)
उप आयुक्त (सा.प्र.)
पुणे महानगरपालिका

१) श्रीमती मधु रणजित चावरिया.